# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणे येथील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

## कलम ४ (१) (ख)(i)

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे |
| पत्ता | १३२/ब, भोसले नगर, भाबुर्डा, पुणे - ७ |
| कार्यालय प्रमुख | महासंचालक, कृषी परिषद |
| शासकीय विभागाचे नाव | कृषी, पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय मुंबई-४०००३२ |
| मंत्रालयातील कोणत्या खात्याच्या अधिनिस्त | कृषी, पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय मुंबई-४०००३२ |
| कार्यक्षेत्रः भौगोलीक/कार्यानुरुप | महाराष्ट्र |
| विशिष्ट कार्ये | राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांच्या कार्यामध्ये, विशेषतः शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्यासाठी आणि विद्यापीठाच्या कार्याचे नियतकालिक मुल्यमापन करण्यासाठी आणि विद्यापीठे आणि त्यांची शैक्षणिक कार्ये व वित्तीय व्यवहार यांवर देखरेख ठेवणे. |
| विभागाचे घ्येय/धोरण | राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांच्या कार्यामध्ये, विशेषतः शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व समान हितसंबंध असलेल्या इतर बाबी यांच्याशी संबंधित कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणणे |
| सर्व संबंधित कर्मचारी | महासंचालक (१), संचालक (३), सहसंचालक (२) व तृतीय (२६) व चतुर्थ श्रेणी कर्मचारी (९) एकूण ४१ |
| कामाचे विस्तृत स्वरुप | १)विद्यापीठाच्या वार्षिक योजना व अशा योजनांचे भागा असणा-या योजना यास मान्यता देणे.<br>२)कलम ५४ च्या उपबंधान्या अधीन राहुन विद्यापीठाच्या वार्षिक वित्तीय अंदाजांना मान्यता देणे<br>३)अर्थसंकल्पीय अनुदानांचे पुर्नविनीयोजन करण्यासाठी म्हणून विद्यापीठाने मांडलेल्या कोणत्याही प्रस्तावास मान्यता देणे<br>४)कोणत्याही नवीन विद्याशाखा, पाठ्यक्रम किंवा ज्ञानशाखा किंवा विभाग सुरु करण्यासाठी त्याचप्रमाणे कोणत्याही अभ्यासक्रमासाठी जादा जादा वैकल्पिक विषय सुरु करण्याकरीता विद्यापीठांना परवानगी देणे<br>५)कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्याच्यावरील अंदाजित खर्च रु.तीन लाख किंवा त्याहुन अधिक आहे अशा कोणत्याही इमारतीच्या बांधकामांस प्रशासकीय मान्यता देणे, |

| | |
|---|---|
| | ६)कोणत्याही विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या ज्यावरील अंदाजित खर्च रु.पाच लाख किंवा त्याहून अधिक आहे अशा साधनसामुग्रीच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता देणे<br>७)विद्यापीठांच्या कार्यात प्रभावी समन्वय घडवून आणण्याच्या आणि त्यांना योग्य मार्गदर्शन व निर्देशन करण्याच्या दृष्टीने ,पशुसंवर्धन, फलोत्पादन, वनशास्त्र, दुग्धशाळा, विज्ञान व अन्नतंत्रशास्त्र आणि मत्स्यव्यवसाय यांच्याशी संबंधित असलेली कामे धरुन, कृषी शिक्षण,अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांच्या संबंधात , विद्यापीठामध्ये पार पाडण्यात आलेल्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे<br>८)त्यांनी केलेल्या नियतकालीक मुल्यमापनासंदर्भात, विद्यापीठाच्या कामकाजाविषयी कुलपतीला सूचित करणे<br>९)परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर विद्यापीठास योजनांतर्गत व योजनेतेर अशा दोन्ही प्रकारचे निधी आवश्यक वाटेल अशा कालांतराने देण्याविषयी राज्यशासनास विनंती करणे<br>१०)राज्य शासनाद्वारे तिच्याकडे निर्दिष्ट केल्या जातील अशा विद्यापीठाच्या कार्याशी संबंधित कोणत्याही बाबीविषयी राज्य शासनास सल्ला देणे<br>११)या अधिनियमांचे उपबंध अंमलात आणण्यासाठी अनुषंगिक व आवश्यक असेल अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कामे पार पाडणे. |
| मालमत्तेचा तपशील | जागा १०,००० चौ.मी.<br>व त्यावरील इमारत २३९३ चौ.मी. |
| संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचा प्रत्येक स्तरावरील तपशील | संरचनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. |
| कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक<br><br>व वेळा | ०२०-२५५३१२०८,२५५३७६८८,२५५३४५७७<br><br>सकाळी १०.०० ते दुपारी ०१.३० व<br>दुपारी ०२.०० ते संध्याकाळी ०५.४५ |
| साप्तहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | साप्ताहिक सुट्टी रविवार, दुसरा व चौथा शनिवार, शासनाने घोषीत केलेल्या सुट्ट्यांचे दिवशी व जिल्हाधिकारी पुणे यांनी जाहिर केलेल्या स्थानिक सुट्ट्यांच्या दिवशी कार्यालय बंद राहील. |